# Employment Opportunities During COVID-19 Pandemic Period Time

## दिनांक – १६/१२/२०२०

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, अर्थशास्त्र विभागातर्फे ' **Employment Opportunities During COVID-19 Pandamic Period Time**'

या विषयावर ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मार्गदर्शक वक्ता म्हणून डॉ. राजु श्रिरामे, उपप्राचार्य व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, जीवन विकास महाविद्यालय हे होते. तर अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. प्रज्ञा बागडे ह्या होत्या.

कोरोना काळामध्ये राज्यनिहाय वाढलेली बेरोजगारी, कोरोना अगोदर व नंतर काळामध्ये अर्थव्यवस्थेची खालावलेली परिस्थिती यावर श्रिरामे सरांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. तसेच अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळ्या क्षेत्रामधील वाढलेली बेरोजगारी व त्या बेरोजगारीवर उपाय म्हणून कोणकोणत्या रोजगार संधी आहेत याविषयी सुद्धा सरांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. प्रज्ञा बागडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. लखन इंगळे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील विविध विभागातील प्राध्यापक वर्ग तसेच इतर महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते.